प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

१७ मार्च २०१९

# सिडको महामंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण
# सिडकोचा ४९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा

"१७ मार्च १९७० साली स्थापन झालेल्या सिडको महामंडळाने गेल्या ४९ वर्षात ३५-४० लाख नागरिकांसाठी निवारा प्रदान करण्याबरोबरच रोजगार, सामाजिक सुविधाही सक्षमतेने उपलब्ध करून दिल्या आहेत. सिडकोतील अधिकारी कर्मचारी यांची मेहनत केवळ शारीरिक स्वरूपाची नसून ते भावनिक व बौध्दिक रित्याही सिडको महामंडळाशी निगडीत झाले आहेत. सिडकोने वसवलेल्या नवी मुंबई शहरास राष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या मोस्ट लिव्हेबल सिटी या स्पर्धेत दुसऱ्या मानांकाचा बहुमान प्राप्त झाला आहे आणि हेच महामंडळाच्या मेहनतीची पावती आहे. सिडको महामंडळात गुणवत्ता ठासून भरली आहे, तसेच पैलू पाडणाऱ्याच्याही कमतरता नाही त्यामुळे यापुढे सिडको महामंडळातून केवळ हिरेच बाहेर पडतील" असे गौरवोद्गार सिडको महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. अशोक शिनगारे** यांनी सिडकोच्या ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या सोहळ्यात काढले. आज दिनांक १७ मार्च २०१९ रोजी सिडको सभागृह, ७ वा मजला, सिडको भवन येथे अत्यंत उत्साहात व थाटामाटात सिडकोचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. नगर नियोजन व विकासाची गौरवशाली परंपरा लाभलेले सिडको महामंडळ आजपासून सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत असल्यामुळे या समारंभास एक विशेष महत्व प्राप्त झाले होते.

या प्रसंगी **श्री. अशोक शिनगारे,** सहव्यवस्थापकीय संचालक, **श्री. बिवलकर** (मुख्य लेखा अधिकारी), **श्री. फैय्याज शेख,** व्यवस्थापक (वसाहत-१), **श्री. निलेश तांडेल,** अध्यक्ष, सिडको कर्मचारी संघटना, **श्री. विनोद पाटील,** उपाध्यक्ष, सिडको कर्मचारी संघटना, **श्री. जे. टी. पाटील,** सरचिटणीस, सिडको कर्मचारी संघटना, **श्री. मिलिंद बागूल,** अध्यक्ष, सिडको बी. सी. एम्प्लॉईज संघटना, **श्री. सुरेश ठाकूर,** अध्यक्ष, सिडको इंजिनिअर्स असोसिएशन होते. बहुसंख्य आजी अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबतच या महत्वपूर्ण सोहळ्यास सिडकोचे माजी अधिकारी-कर्मचारी देखील आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना श्री. अशोक शिनगारे पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील इतर प्रदेशात एवढंच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही उदा. रायपूर येथे सिडको महामंडळाविषयी एक आत्मीयता दिसून येते व सिडकोचे नगर नियोजनातील कौशल्य नेहमीच वाखाणले जाते. मी आजपर्यंत १४-१५ वेगवेगळ्या महामंडळात कार्यरत होतो पण स्वत:च्या महामंडळाविषयी एवढी आत्मीयता मी फक्त सिडको महामंडळातच बघितली.

श्री. निलेश तांडेल यांनी आपल्या भाषणाच्या सुरूवातीसच सिडकोच्या वाटचालीत सिंहाचा वाटा असणाऱ्या अनेक आजी माजी अधिकाऱ्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांनी सिडको प्रति केलेल्या योगदानाबद्दल आभार मानले. ते

आपल्या भाषणात पुढे म्हणाले प्रारंभी सिडकोविषयी येथील प्रकल्पग्रस्तांची अतिशय प्रखर भावना होती पण त्यावेळी हेही मान्य केले पाहिजे की अत्यंत कमीत कमी मालमत्ताकरात देखील सिडको महामंडळाने अतिशय उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा नवी मुंबईतील नागरिकांना पुरविल्या आहेत. सिडको व्यवस्थापनाने जर सहकार्य केले तर भारतातील नामवंत कार्पोरेट कंपन्याशी सिडको महामंडळ स्पर्धा करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीस सिडको आर्टिस्ट कंबाईनच्यावतीने गणेश वंदना सादर करण्यात आली. त्यानंतर ४९ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य केक श्री. अशोक शिनगारे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कापण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमास सिडको अधिकारी व कर्मचारी यांच्याबरोबरच त्यांचे कुटुंबियही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------------------------------------------------------------------------------

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**